**MVP'S**
**Art's & Commerce College Vadner Bhairav,**
**Tal-Chandwad, Dist-Nashik**


**7.1.8 Describe the Institutional efforts/initiatives in providing an inclusive environment i.e., tolerance and harmony towards cultural, regional, linguistic, communal socioeconomic and other diversities**

**INDIAN PLEDGE**




PLEDGE
India is my country. All Indians are my brothers and sisters.
I love my country, and I am proud of its rich and varied heritage. I shall always strive to be worthy of it.
I shall give my parents, teachers and all elders respect, and treat everyone with courtesy.
To my country and my people, I pledge my devotion. In their well-being and prosperity alone lies my happiness.
Maratha Vidya Prasarak Samaj's
ARTS AND COMMERCE COLLEGE,VADN
Tal. Chandwad, Dist. Nashik, PIN – 42
STUDENT GRIEVANCE COMM
SR. NO | NAME OF MEMBER | DES
1. | PRIN. A. L. BHAGAT | CHA
2. | MR. N.D. WADGHULE | MEM
3. | MR. D. H.BHAGURE | MEM
4. | DR. D. D. GAVHANE | MEM
5. | SMT. M.M.BHOSALE | MEM
Arts & C
College
Google
Shirwade Wani, Maharashtra, India
Vadner Bhairav Rd, Shirwade Wani, Maharashtra 423111, India
Lat N 20° 13' 38.865"
Long E 74° 2' 31.47576"
19/09/20 12:32 PM

# University Songs


पुणे विद्यापीठ गीत
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान
पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान
जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान
माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हें पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान
सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
न्यायास्तव जागृति ही सत्त्वपरीक्षा
हें विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान
मंगेश पाडगांवकर
Arts & Colleg
Google
Shirwade Wani, Maharashtra, India
Vadner Bhairav Rd, Shirwade Wani, Maharashtra 423111, India
Lat N 20° 13' 38.63712"
Long E 74° 2' 30.44796"
19/09/20 12:31 PM

## Constitution of India




सकाळ




वडनेरभैरव : महाविद्यालयात रेड रिबन क्लब आणि रासेयोतर्फे शुक्रवारी एड्स जनजागृती सप्ताहानिमित्त काढण्यात आलेली रॅली.

# वडनेरभैरव महाविद्यालयात रासेयोंतर्गत एड्स जनजागृती सप्ताह

सकाळ वृत्तसेवा

वडनेरभैरव, ता. ७ : येथील मविप्र कला व वाणिज्य महाविद्यालयात एड्स जनजागृती सप्ताहानिमित्त विविध जनजागृती उपक्रम घेण्यात आले.

रेड रिबन क्लब आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे एड्स जनजागृती रॅली, रांगोळी व निबंध स्पर्धा तसेच व्याख्यान घेण्यात आले. चांदवड येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्राच्या समुपदेशक सुनंदा शिंदे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ शीतल गायकवाड, समुपदेशक सुषमा मोरे या वेळी प्रमुख पाहुणे होते. एड्सबाबत अजूनही ग्रामीण भागात जनजागृती होणे आवश्यक आहे, असे मत श्रीमती मोरे यांनी व्यक्त केले. रांगोळी स्पर्धेतील प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थिनींना या वेळी पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला प्रा. एन. डी. वडघुले, प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. एन. एन. भोसले, प्रा. भीमराज गायकवाड, प्रा. जयश्री शिंदे, प्रा. राणी पाटील, प्रा. प्रमोद निकम आदींसह प्राध्यापक उपस्थित होते. प्रा. जाधव यांनी प्रास्ताविक केले, तर प्रा. ज्ञानेश्वर भगुरे यांनी सूत्रसंचालन केले.

### संत ज्ञानेश्वर विद्यालयात काव्यवाचन

मालेगाव साठ, ता. ७ : येथील संत ज्ञानेश्वर विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक के. डी. देवरे अध्यक्षस्थानी होते. त्यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी भाषणे केली व काव्यरचना सादर केल्या. शिक्षक व्ही. के. मोरे व अध्यक्ष देवरे यांनी मनोगत व्यक्त केले. सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

Nashik Malegaon
08/12/2019 Page No. 8

**अभियान** • वडनेरभैरव महाविद्यालयात आमदार डॉ. राहुल आहेर यांचे आवाहन

# युवकांनी मतदार नोंदणी करून राष्ट्रकार्यात सहभाग नोंदवावा

**प्रतिनिधी** | वडनेरभैरव

मतदान करणे हे आपले कर्तव्य आणि अधिकारही आहे. प्रत्येक तरुण युवक हा आज देशाचा विचार करू लागला आहे. त्याचे विचार आता कृतीत परिवर्तित होण्याची गरज आहे. त्यासाठीच महाराष्ट्र शासनाने हे नवमतदार जागृती अभियान सुरू केले असून सर्व युवांनी आपला मतदार नोंदणी फॉर्म भरून मतदार व्हावे व राष्ट्रकार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार डॉ. राहुल आहेर यांनी केले.

येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच नवमतदार नोंदणी अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आमदार डॉ. आहेर बोलत होते.

प्रास्ताविकात प्राचार्य ए. एल. भगत यांनी महाविद्यालय गेल्या तीन वर्षांपासून या स्वरूपाचे अभियान राबवत असून त्याला विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभत असल्याचे सांगितले.

स्वातंत्र्यापूर्वी समाजात काही निवडक लोकांनाच मतदानाचा अधिकार असायचा, मात्र घटनेने प्रत्येक सज्ञान भारतीय व्यक्तीस हा अधिकार दिला आहे, ही लोकशाहीची फार मोठी देणगी असल्याचे मत दिलीप धारराव यांनी व्यक्त केले. महाविद्यालयात आठवडाभर हे अभियान सुरू असणार असून अधिकाधिक विद्यार्थी व नागरिकांनी या अभियानात सहभागी होऊन मतदान नोंदणी व मतदार यादीतील नावात दुरुस्ती करून घ्यावी, असे आवाहन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



वडनेरभैरव येथील कला आणि वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मतदार नोंदणी अभियानाच्या उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आमदार डॉ. राहुल आहेर. समवेत मान्यवर.

# दिंडोरी जनता इंग्लिश स्कूलमध्ये मतदार जनजागृती मोहिमेस प्रारंभ

**प्रतिनिधी** | दिंडोरी

येथील जनता इंग्लिश स्कूल व उच्च माध्यमिक विद्यालयात गटशिक्षणाधिकारी डी. बी. कनोज व प्राचार्य सी. बी. पवार यांनी इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना मतदार जनजागृती व नवीन मतदार नोंदणीबाबत सविस्तर माहिती दिली.

आपल्या भारताची लोकशाही बळकट करण्यासाठी नवीन मतदान नोंदणी व मतदार जनजागृती करण्याच्या हेतूने जिल्हाधिकारी सूरज मांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात नागरिक, विद्यार्थी यांच्यात जनजागृती सुरू आहे. त्याच उपक्रमांतर्गत दिंडोरी जनता विद्यालयात जनजागृती करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मतदार प्रश्नावली फॉर्म देत त्यावर विचारलेल्या प्रश्नांची माहिती भरण्याबाबत सूचना दिल्या व आपल्या कुटुंबातील व परिसरात ज्यांचे वय १ जानेवारी २०१९ रोजी १८ वर्षे पूर्ण झाले असतील अशा सर्व नागरिकांची नवीन मतदार नोंदणी करणे व जे मतदार आहेत त्यांनी मतदान करणे व मतदार यादीत चुका असतील तर त्यात दुरुस्ती करणे याबाबत माहिती देत मतदान कसे करायचे याची माहिती यावेळी कनोज यांनी दिली.



दिंडोरी येथील जनता इंग्लिश स्कुल व उच्च माध्यमिक विद्यालयात मतदार जनजागृती प्रश्नावली वाटपप्रसंगी गटशिक्षणाधिकारी बी. डी. कनोज, प्राचार्य सी. बी. पवार, कॉलेज विभागप्रमुख ए. व्ही. कदम आदी.

यावेळी प्रा. ए. व्ही. कदम, प्रा. एस. जे. उफाडे आदींसह प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# समाजशीलतेची जाणीव आयुष्यभराची शिदोरी

## तुषार शेवाळे : शिरवाडे वणी येथे रासेयो शिबिरास प्रारंभ

सकाळ वृत्तसेवा

**वडनेरभैरव, ता. ६ : राष्ट्रीय सेवा योजना ही संस्कारांची शिदोरी आहे. एनएसएसच्या स्वयंसेवकांना विशेष श्रमसंस्कार शिबिरातील संस्कारांतून समाजाप्रति आपण काही देणे लागतो ही जाणीव निर्माण होते. ही समाजशीलतेची जाणीव त्याच्या आयुष्यभराची शिदोरी असते, असे मत मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार शेवाळे यांनी व्यक्त केले.**

मविप्र संस्थेच्या कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पिंपळगाव बसवंत आणि कला व वाणिज्य महाविद्यालय, वडनेरभैरव यांच्यातर्फे संयुक्त शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी शिरवाडे वणी येथे ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर संस्थेचे चिटणीस डॉ. सुनील ढिकले, पोलिस निरीक्षक संजय महाजन, सहाय्यक कार्यकारी अभियंता राकेश गुजर, प्रतापदादा मोरे, अशोक मोरे, भास्कर निफाडे, सरपंच शरद काळे, पोलिसपाटील दत्तू निफाडे, किशोर निफाडे, दत्तासाहेब निफाडे, गोविंद ठाकरे, पंडित आहेर, शिवाजी निफाडे, संपतराव निफाडे, पुंडलिक निफाडे, सुनंदा खैरे, प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर, प्राचार्य ए. एल. भगत, मुख्याध्यापक पी. एस. बोराडे आदी उपस्थित होते.

पोलिस निरीक्षक संजय महाजन यांनी विद्यार्थ्यांनी वाहतुकीचे नियम पाळले पाहिजेत. सोशल मीडियाचा जपून वापर करावा, स्वयंशिस्त बाळगावी, असे आवाहन करीत रॅगिंग डेची माहिती दिली. उपप्राचार्य डी. डब्ल्यू. दाते, दिलीप माळोदे, ज्ञानोबा ढगे, नामदेव गावित, डी. के. दरेकर, ए. एन. गवळी, एस. व्ही. कोल्हे, एन. डी. वडघुले, विठ्ठलराव जाधव, एम. एन. भोसले, भीमराज गायकवाड, प्रमोद निकम, सुदाम राठोड, ज्ञानेश्वर भगुरे आदींनी संयोजन केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी अल्ताफ देशमुख, शोभा डहाळे यांनी सूत्रसंचालन केले. संजय खैरे यांनी आभार मानले.



**शिरवाडे वणी : राष्ट्रीय सेवा योजनेच्या ध्वजाचे ध्वजारोहण करून उद्घाटन करताना सरपंच शरद काळे. डॉ. तुषार शेवाळे, डॉ. सुनील ढिकले, संजय महाजन, राकेश गुजरे, प्राचार्य अमोल भगत, प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर आदी.**



वडनेर भैरवला सीमेवरील सैनिकांसाठी राख्या संकलित करताना सुरेश सलादे, प्राचार्य अमोल भगत व विद्यार्थिनी.

# सिमेवरील जवानांना राख्या पाठवून व्यक्त केली कृतज्ञता

## वडनेरला 'एक धागा शौर्याचा राखी अभिमान की' हा उपक्रम

प्रतिनिधी | वडनेर भैरव

सलादे बाबा कला क्रीडा मंडळ ट्रस्टच्या माध्यमातून शनिवारी (दि. १०) महिला व विद्यार्थिनींनी 'एक धागा शौर्याचा राखी अभिमान की' हा उपक्रम राबवत सीमेवर गस्त घालणाऱ्या सैनिकांना राख्या पाठविल्या. हा कार्यक्रम संस्थापक सुरेश सलादे यांच्या संकल्पनेतून साकार झाला.

यावर्षी ट्रस्टच्या वतीने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत महिला वर्गाने राख्या आणि भेटकार्ड बनवून देशप्रेम दाखवून दिले. या राख्या व भेटकार्ड स्पीड पोस्टने सिमेवरील जवानांना पाठविण्यात आल्या. यासाठी प्राचार्य अमोल भगत, मराठी शाळेचे मुख्याध्यापक किरण जाधव, मुख्याध्यापिका सुरेखा शिंदे, केंद्र प्रमुख केशव जाधव, शिक्षक व गावातील महिला वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष मनोहर पाटोळे, उपाध्यक्ष मानसिंह ढोमसे, सचिव राहुल पाचोरकर, विश्वस्त नाना सलादे, दत्तात्रय निखाडे, दीपक पाचोरकर, अशोक सलादे, रामचंद्र मोरे, जितेंद्र निफाडे, संदीप वक्ते, सुरेश पवार उपस्थित होते. या उपक्रमास संजय भालेराव, किरण जाधव, विलास पाचोरकर, विक्रम सलादे यांनी मदत केली.

# युवकांनी च
# विकासात र



चांदवड येथे फत्तेह बॉईज संचलित
उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शक प्रशांत ठा

## चांदवड बहुउद्देशीय विकास संस्थेचे उद्घाटन

प्रतिनिधी | चांदवड

जातीय सलोख्याचे शहर म्हणून चांदवड ओळखले जाते. त्यात सर्व जाती-धर्मांचे महत्वाचे योगदान आहे. युवकांनी चांदवडच्या विकासासाठी आपले योगदान देत शहराचा नावलौकीक वाढविण्याची गरज आहे. चांदवडच्या जातीय सलोख्याचे नाव 'चांदवड पॅटर्न' म्हणून राज्यातच नव्हे तर देशात झाले पाहिजे, असे प्रतिपादन प्रांताधिकारी सिद्धार्थ भंडारे यांनी केले.

चांदवड येथील फत्तेह बॉईज संचलित चांदवड बहुउद्देशीय

**दिव्य मराठी विशेष** • युवासेनेतर्फे स्कूल बॅग व छत्र्यांचे वाटप

लोकमत




चांदवड तालुक्यातील वडनेरभैरव येथील महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी राख्या संकलित करुन त्या सीमेवरील सैनिकांसाठी पाठविण्यात आल्या.

# वडनेरभैरवकरांचा सैनिकांसाठी राखी उपक्रम

**वडनेरभैरव :** वडनेरभैरव येथील महिला व मुलींनी यावर्षी प्रथमच एक धागा शौर्याचा राखी अभिमान की, हा उपक्रम सलादेबाबा कला, क्रीडा मंडळ ट्रस्टच्या माध्यमातून राबवून आपल्या सीमेवर गस्त घालणाऱ्या सैनिकांना या राख्या पाठवून त्यांना जयहिंद व सलाम व स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देण्याचा उपक्रम साकार झाला. राज्यस्तरावर सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या सलादे बाबा कला, क्रीडा मंडळ ट्रस्ट यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी व देशभक्ती यासाठी विविध कार्यक्रम राबविण्यात येतात. या वर्षी ट्रस्टच्या वतीने राखी पौर्णिमा व स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने वडनेरभैरवच्या महिला व मुलींना सीमेवर तैनात असलेल्या सैनिकांना आपल्या गांवाच्या वतीने राख्या व स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा पाठविण्यात आल्या. वडनेरभैरवच्या महिलावर्गाने स्वत: बनविलेल्या राख्या व संदेश भेटकार्ड पाठवून देशप्रेम दाखवून दिले. या सर्व राख्या मंडळाच्या वतीने जलदगती पोस्टाने सैनिकांना पाठविण्यात आल्या. असा उपक्रम गावाच्या वतीने प्रथमच राबविण्यात आला. या उपक्रमाला मराठा विद्याप्रसारक समाज नाशिकच्या सिनिअर कॉलेजचे प्राचार्य अमोल भगत, एनएसएस कार्यक्रम अधिकारी भगुरे, सर्व प्राध्यापक, मराठी शाळा मुख्याध्यापक किरण जाधव, प्राथमिक कन्या शाळा मुख्याध्यपिका सुरेखा शिंदे, केंद्रप्रमुख केशव जाधव व सर्व शिक्षक, गावातील महिलावर्ग यांनी मोलाचे सहकार्य केले.

यावेळी मनोहर पाटोळे, मानसिंह ढोमसे, राहुल पाचोरकर, निखाडे उपस्थितीत होते.

> 'एक धागा शौर्याचा राखी अभिमान की' या उपक्रमामुळे भारत मातेच्या सीमेवरील रक्षण करणाऱ्या माझ्या भावाला मला बहिणीचे प्रेम व कृतज्ञता पाठविता आली. मी स्वत:ला भाग्यवान समजते.
>
> **- नम्रता गोविंद म्हसकर**

**संशोधन** • चांदवड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे वडनेरभैरव महाविद्यालयात उद्घाटन

# वडनेरभैरवला ३१४ उपकरणांची मांडणी

प्रतिनिधी । वडनेरभैरव

चांदवड पंचायत समितीचा शिक्षण विभाग, तालुका विज्ञान अध्यापक संघ आणि येथील कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जि. प. सदस्य डॉ. आत्माराम कुंभार्डे यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी पंचायत समिती सभापती अमोल भालेराव होते. तर मविप्रचे शिक्षणअधिकारी नानासाहेब पाटील, जि. प. सदस्या शोभाताई कडाळे, कविता धाकराव, पंचायत समिती सदस्य नितिन आहेर, शिवाजी सोनवणे, गटविकास अधिकारी महेश पाटील, सरपंच शांताबाई वेंडके, स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष (ज्यु. कॉलेज) हिरामण शिंदे, सनराईज स्कूल शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजाभाऊ भालेराव, गटशिक्षणाधिकारी श्रीधर देवरे, विस्तार अधिकारी एस. एस. कांबळे, आर. एन. पाटील, विज्ञान अध्यापक संघ अध्यक्ष विनायक पाटील, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डी. आर. बारगळ, कार्यक्रमाचे संयोजक प्राचार्य ए. एल. भगत व्यासपीठावर उपस्थित होते. शिक्षण विस्तार अधिकारी आर. एन. निकम यांनी विज्ञान प्रदर्शनाचा हेतू आणि तालुक्यातील शाळांचा सहभाग याविषयी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाला दत्तात्रेय माळी, डी. एल. आबा पाचोरकर, एस. आर. पवार, भाऊसाहेब भालेराव, विजय भालेराव, पोपटराव पाचोरकर, डॉ विक्रम सलादे, जीभाऊ शिंदे, बापूराव सोनवणे, सनराइजच्या प्राचार्य अनिता नायडू, मुख्याध्यापक के. आर. सोनवणे, प्रा. एन. डी. वडघुले, प्रा. विठ्ठलराव जाधव, प्रा एम.एम. भोसले, भीमराज गायकवाड, जयश्री शिंदे, राणी पाटील, प्रमोद निकम आदींसह प्राध्यापक, सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. ज्ञानेश्वर भगुरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. दिलीप पाटील यांनी आभार मानले.



चांदवड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या उपकरणांची पाहणी करताना मान्यवर.



चांदवड : प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी काढलेल्या रांगोळ्या.

### प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना नवनिर्मितीचा आनंद

*विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा निर्माण होणे गरजेचे आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वैज्ञानिक दृष्टिकोन देणे गरजेचे आहे. त्यासाठी वैज्ञानिक संस्कार करावे लागतील. विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना नवनिर्मितीचा आनंद मिळेल आणि त्यातून उद्याचा भारत तंत्रज्ञानाच्या जोरावर जगात नाव उज्ज्वल करेल.*

**- डॉ. आत्माराम कुंभार्डे,**
जिल्हा परिषद सदस्य

### वडनेरभैरव गावाला संशोधनाची परंपरा

*वडनेर गावाला संशोधनाची परंपरा असून या गावचे भूमिपुत्र जयवंत भालेराव हे अहमदाबाद येथे शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहे. अशा विज्ञान प्रदर्शनांतूनच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, असे सांगून विज्ञान प्रदर्शनासाठी आलेल्या विद्यार्थी व शिक्षकांना शुभेच्छा!*

**- अमोल भालेराव,**
सभापती, पंचायत समिती

### असा आहे सहभाग

विज्ञान प्रदर्शनामध्ये चांदवड तालुक्यातील २७६ शाळा सहभागी झाल्या आहेत. ३१४ संशोधन मॉडेल विद्यार्थ्यांनी मांडले आहेत.

# सिन्नरला तालुकास्तरीय प्रदर्शन

प्रतिनिधी | सिन्नर

४५व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात ११५ उपकरणांची मांडणी करण्यात आली असून दोन दिवस चालणाऱ्या प्रदर्शनाला तालुक्यातील दोन हजारावर विद्यार्थी भेट देणार आहेत. जिल्हा परिषद अध्यक्षा शीतल सांगळे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

उपसभापती संगीता पावसे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य नीलेश केदार, प्रभारी गटशिक्षणाधिकारी मंजूषा साळुंखे, विस्तार अधिकारी राजीव लहामगे, दिलीप पवार, पंचायत समिती सदस्य जगन्नाथ भाबड, सुमन बर्डे, दिलीप बिन्नर, सोनल बिन्नर, साहेबराव कुटे, मुख्याध्यापक संघाचे एस. बी. देशमुख, तालुका विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष कल्पेश चव्हाण, उपाध्यक्ष शिवाजी गाडेकर, कोषाध्यक्ष योगेश जाधव, आर. टी. गिरी, मुख्याध्यापिका मनीषा गुरुळे, स्वाती भोर्जे, गोपाळराव आढाव आदी उपस्थित होते. सिल्व्हर लोटस स्कूलमध्ये हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे.

जिल्हा परिषद अध्यक्षा सांगळे यांनी शाळांच्या सहभागाचे स्वागत केले. प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांना शोधांचे अवलोकन करता येते. त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो. विज्ञान क्षेत्रात विविध संधी उपलब्ध असून प्रदर्शनामुळे विद्यार्थिदशेतच शोधकार्याची गोडी लागत असल्याचे त्यांनी सांगितले. सिल्व्हर लोट्स स्कूलचे दिलीप बिन्नर यांनी प्रदर्शनातून एक तरी उपकरण देशपातळीवर पोहोचावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

जिल्हापरिषदेकडे मुख्याध्यापक संघाने केलेल्या मागणीनुसार जिल्हास्तरीय प्रदर्शनासाठी ७ लाख तर तालुकास्तरीय प्रदर्शनासाठी ९५ हजार रुपयांची मदत जिल्हा परिषदेकडून मिळत आहे. अध्यक्षा सांगळे यांनी ही मदत मिळवून दिल्याबद्दल त्यांचे देशमुख यांनी कौतुक केले.

पुढारी

संक्षिप्त



**चांदवड : वडनेरभैरव महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नारायणगाव येथील शिवनेरी किल्ल्यावर स्वच्छता केल्यावर उपस्थित स्वयंसेवक विद्यार्थी व शिक्षक.**

## वडनेरभैरवला शिवजयंती साजरी

**चांदवड :** वडनेरभैरव येथील मविप्र समाज संचलित कला व वाणिज्य महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त शिवचरित्रकार नवनाथ चव्हाण यांचे व्याख्यान झाले. व्यासपीठावर मविप्र संचालक उत्तमबाबा भालेराव, महाविकास समितीचे अध्यक्ष दिलीप धारराव, परशराम पाचोरकर, पोपटराव पाचोरकर, प्रमोद कमोद, प्राचार्य ए. एल. भगत उपस्थित होते. प्राचार्य भगत यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ज्ञानेश्वर भगुरे यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, शिवजयंतीनिमित्त २२ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयाचा रासेयो विभाग व पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नारायणगाव पुणे येथील शिवरायांचे जन्मस्थान किल्ले शिवनेरी येथे एकदिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात करून शिवनेरी गडावर स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यात महाविद्यालयातील १५० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. यावेळी प्रा. विठ्ठल जाधव, प्रा. एन. डी. वडघुले, प्रा. डॉ. डी. डी. गव्हाणे, प्रा. बी. पी. गायकवाड, प्रा. डी. बी. पूरकर, प्रा. स्वप्नील दुर्धवळे, प्रा. सुनील लोखंडे, प्रा. ज्ञानेश्वर भगुरे आदींसह स्वयंसेवक उपस्थित होते.

पुढारी



गोहरण : वडनेरभैरव महाविद्यालयाच्या वतीने वृक्षारोपण करताना मविप्र संचालक उत्तम भालेराव, सरपंच पवनकुमार जाधव, नितीन आहेर, कविता धाकराव, ज्ञानेश्वर सपकाळे, दिलीप धारराव, प्राचार्य अमोल भगत आदींसह उपस्थित मान्यवर व विद्यार्थी. (छाया : सुनील थोरे)

# वडनेरभैरव महाविद्यालयाचा वृक्षारोपण महोत्सव सुरू

**चांदवड : वार्ताहर**

मविप्र समाज संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व गोहरण ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण समारोह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी व ग्रामस्थांनी गोहरण येथे वृक्षारोपण केले. मविप्र समाजाचे चांदवड तालुका संचालक उत्तम भालेराव यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जि. प. सदस्या कविता धाकराव, पं. स. सदस्य तथा चांदवड तालुका बाजार समिती उपसभापती नितीन आहेर, वनपाल आर. पी. देशमुख, विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर सपकाळे, कॉलेज कुंडीत लावलेल्या रोपाला पाणी देऊन अनोख्या स्वरूपात सर्व मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या २०१८-१९ साठीच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन करण्यात आले.

प्राचार्य ए. एल. भगत यांनी येत्या तीन वर्षांसाठी गोहरण गाव महाविद्यालयाने दत्तक घेतल्याचे घोषित करून या कालखंडात १०,००० वृक्षलागवड व संगोपनासहित गावात राबविण्यात येणार असलेल्या विविध योजनांची माहिती दिली.

सरपंच ॲड. पवनकुमार जाधव म्हणाले, मविप्र समाजसंस्था व महाविद्यालयाच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या जलसंधारण, वृक्षलागवड, स्वच्छता-आरोग्य जागृती आदी उपक्रमांमुळे आमचे गाव नक्कीच वर्षांत गावात वडनेरभैरव महाविद्यालय राबविणार असलेला १० हजार वृक्षारोपणाचा कार्यक्रम वरदान ठरेल, असे मत व्यक्त केले.

उत्तम भालेराव यांनी राजकीय हेवेदावे व पक्ष राजकारण बाजूला ठेवून गाव व तालुक्याच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन केले. रासेयोजना कार्यक्रम अधिकारी प्रा. ज्ञानेश्वर भगुरे यांनी सूत्रसंचालन केले. तर प्रा. एस. डी. फुगट यांनी आभार मानले. यावेळी रासेयो विद्यार्थ्यांनी पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० रोपांची लागवड केली. ग्रामसेवक एल. व्ही. ठाकरे, मुख्याध्यापक व्ही. पी. आहेर, जि. प. शिक्षक गंगाधर पगार, प्रा. एन. डी. वडघुले, प्रा. एम. आर. धेबडे, प्रा. सारिका दौंड, प्रा. बी. पी. गायकवाड,

# जिल्ह्यात युवकांना भरतीपूर्व प्रशिक्षण

## ग्रामीण पोलिसांकडून महाविद्यालयांमध्ये उपक्रम



पुढारी

## थोडक्यात




वडनेर भैरव : आपद्ग्रस्तांसाठी निधी जमा करताना वडनेर भैरवचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे, प्राचार्य अमोल भगत आदी. (छाया : सुनील थोरे)

# वडनेर भैरव महाविद्यालयाची मदत

**चांदवड :** चांदवड तालुक्यातील वडनेर भैरव येथील मविप्र समाज संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ रासेयो विभाग व विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'केरळ फ्लड रिलिफ फंड'उभारला जात असून, त्यासाठी वडनेर भैरव गावातून निधी जमविण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्रांगणात झाले. यावेळी दिलीप धारराव, हिरामण शिंदे, साहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन साळुंखे, प्राचार्य अमोल भगत आदी उपस्थित होते. प्राचार्य भगत म्हणाले, केरळला आतापर्यंत साडेआठ हजार कोटींहून अधिक नुकसान झाले आहे. वीज, रस्ते आणि सर्व जनजीवन विस्कळीत झाले असून,पदार्थांची अजूनही उणीव आहे. केरळच्या मदतीसाठी देशातली सर्व राज्ये एकवटली आहेत. आपणही याकामी मागे राहता कामा नये. समाजातील प्रत्येक घटकाने राष्ट्रीय आपत्तीच्या काळात संघटित होऊन एकमेकांची मदत करायला हवी असे मत दिलीप धारराव यांनी व्यक्त केले. तसेच राष्ट्रीय ऐक्य दाखवण्याची हीच वेळ असून, अधिकाधिक गावकरी बांधवांनी केरळसाठी डोनेट करावे, असे आवाहन करत पोलीस स्टेशनच्या सर्व कर्मचाऱ्यांनी देखील आपला एक दिवसाचा पगार केरळ मदत निधीत दिल्याचे पोलीस अधिकारी साळुंखे यांनी सांगितले. यानंतर वडनेर भैरव गावात सोसायटी गेटपासून रॅलीला सुरुवात झाली. एनसीसीच्या विद्यार्थी स्वयंसेवकांनी गावातील प्रत्येक गल्ली व दारोदार फिरून दानपेटी फिरवत गावातून केरळसाठी मदत निधी जमा केल्याची माहिती प्राचार्य भगत यांनी दिली.

देशदूत
www.deshdoot.com

नाशिक
रविवार,
दि. २३ जुलै २०१७

# नाशिक / महानगर

## रक्तदान शिबिर...



नाशिक । मविप्र संचलित वडनेर येथील कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय पथकाच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित केले होते. प्रसंगी पिशव्या रक्तसंकलन झाले. शिबिर यशस्वीतेसाठी वैद्यकीय महाविद्यालयाचे डॉ. प्रदीप जाधव, प्रा. डी. डी. गव्हाणे, प्रा. आर. बी. उगले, प्रा. एम. आर. थेबडे, प्रा. एम. एम. भोसले, प्रा. के. एल. शिंदे यांनी प्रयत्न केले. यावेळी प्राचार्य डॉ. ए. एल. भगत, एनएसएस अधिकारी प्रा. डी. एच. भगुरे, सहाय्यक प्रा. एस. डी. फुगट उपस्थित होते.

# ‘जलसंधारण, वृक्षारोपणाने दुष्काळ निवारण शक्य’

## वडनेरभैरव महाविद्यालयाचे गोहरण येथे विशेष जलसंधारण शिबिर

**प्रतिनिधी | वडनेरभैरव**

भविष्यासाठी पाणी वाचविणे व त्यासाठी सर्वांच्या मदतीने जलसंधारणाची कामे करणे, वृक्षारोपण या उपक्रमामार्फत आपल्याला दुष्काळाशी दोन हात करता येईल, असे प्रतिपादन मविप्र सरचिटणीस नीलिमा पवार यांनी केले. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देत विद्यार्थिनींसोबत श्रमदानही केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी मंडळ व पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने ८ ते १४ मे या कालावधीत होणाऱ्या ७ दिवसांच्या विद्यापीठस्तरीय विशेष जलसंधारण शिबिराचे उद्घाटन नुकतेच मविप्र समाज संस्थेच्या सरचिटणीस नीलिमा पवार यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अॅड. पोपटराव पवार हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहायक पोलिस निरीक्षक नितीन पाटील, गोहरणचे सरपंच अॅड.पवनकुमार जाधव, प्राचार्य ए. एल. भगत, मविप्र संचालक उत्तमबाबा भालेराव आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य ए. एल. भगत यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी महाविद्यालय व संस्था नेहमीच आग्रही असतात. त्याचा एक भाग म्हणून उन्हाळी सुटी चालू असतानाही महाविद्यालयाचे सर्वच्या सर्व विद्यार्थी श्रमदानासाठी या गावात हजर झाले. हे सामाजिक बांधिलकीचे द्योतक असल्याचे सांगितले. तसेच महाविद्यालयातर्फे गोहरण हे गाव दत्तक घेण्याची घोषणाही प्राचार्यांनी केली. सरपंच अॅड. पवनकुमार जाधव यांनी मनोगतातून गोहरण गावाला महाविद्यालयाच्या या मदतीचा नक्कीच फायदा होईल असा विश्वास व्यक्त केला.

पाणी फाउंडेशनचे टेक्निकल सहायक राजेश हिवरे यांनी विद्यार्थ्यांना श्रमदानातून जास्तीत जास्त जलसाठा कसा वाढविता येईल याचे प्रशिक्षण देण्याचे आश्वासन दिले. अध्यक्षीय भाषणातून अॅड. पोपटराव पवार म्हणाले, गोहरणचा इतिहास आणि भविष्य यात महाविद्यालय व पाणी फाउंडेशन यांच्या उपक्रमाने मोठा बदल होऊन हे गाव हिरवेगार होऊन पाण्याची पातळी वाढेल, असा विश्वास व्यक्त केला.



**गोहरण येथे श्रमदान करताना वडनेरभैरव महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी. समवेत शिक्षक.**

सूत्रसंचालन शिबिरप्रमुख व रा.से. यो. अधिकारी प्रा. डी. एच. भागुरे यांनी केले. प्रा. डी. डी. गव्हाणे यांनी आभार मानले.